श्री.सी.डी. फकीर, निवृत्त मुख्य अभियंता यांची लवाद (Arbitrator) म्हणून नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.१६२/क्रीयुसे-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २८ सप्टेंबर, २०१७.

वाचा:- सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांचे पत्र क्र.बीओटी/हॉटेल/न्या.प्र./ लवाद/२०१७-१८/का.११/९२९,दि.८ सप्टेंबर,२०१७ चे पत्र.

प्रस्तावना:-

तिस-या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी, पुणे येथे बांधा वापरा व हस्तांतर करा या तत्वावर मे.ऑर्चिड हॉटेल प्रा.लि. या हॉटेलचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तथापि या संदर्भात वार्षिक भूभाडयाच्याबाबत वाद निर्माण झाल्याने हॉटेल व्यवस्थापनाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आर्बिट्रेशन याचिका क्र.२४२४/१४ दाखल करुन लवाद व लवादाचे पॅनेल नियुक्त करण्याची विनंती केली होती. वरील दाखल केलेल्या रिट पिटीशन संदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१ जुलै,२०१६ रोजी आदेश पारित करुन शासनाच्या वतीने श्री.एम.व्ही.पाटील, निवृत्त सचिव, महाराष्ट्र शासन यांची लवाद म्हणून नियुक्ती केलेली होती. परतु श्री.एम.व्ही.पाटील यांनी काम करण्यास असमर्थता दर्शविली असल्याने त्यांच्या ऐवजी श्री. डी.वाय.पाटील, निवृत्त अधिक्षक अभियंता यांनी लवाद म्हणून काम करण्यास तयारी दर्शविलेली आहे. त्यानुसार दि.२७ मार्च,२०१७ अन्वये त्यांची नियुक्ती "लवाद (Arbitrator)" म्हणून करण्यात आली होती.

२. तथापि मे.ऑर्चिड हॉटेल सोबत झालेल्या दि.१८.८.२००७ च्या करारनाम्यामधील अट क्र.१९.३ मधील(II) नुसार The Person to be appointed as an arbitrator shall not be below the rank of Chief /Engineer/Rtd.Chief Engineer अशी तरतूद असल्याने व श्री.डी.वाय.पाटील,निवृत्त अधिक्षक,सा.बां.विभाग हे वरील अटींची पूर्तता करीत नसल्याने यांचे ऐवजी श्री.सी.डी.फकीर,निवृत्त मुख्य अभियंता यांचे नाव लवाद म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

दि.१८.८.२००७ च्या करारनाम्यामधील अट क्र.१९.३ मधील(II) तरतुदीनुसार शासनाचे वतीने श्री.सी.डी. फकीर, निवृत्त मुख्य अभियंता यांची लवाद (Arbitrator) म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी याप्रकरणी शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत शासनाचे वतीने लवाद म्हणून करारनाम्यातील तरतूदीनुसार काम करावे. याबाबतचा अहवाल वेळोवेळी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व शासनास पाठवावा.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१००४१७५४५२५९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.10.04 17:44:43 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मत्रालय, मुंबई-४०००३२.
२. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मत्रालय, मुंबई-४०००३२.
३. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मत्रालय, मुंबई-४०००३२.
४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे
५. सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई, अपील विभाग,
६. उप सचिव, शालेय शिक्षण व क्रडा विभाग,मंत्रालय,मुंबई-४०००३२.
७. निवडनस्ती, क्रीयुसे-१.